# University of Mumbai

# Institute of Distance and Open Learning

(Providing Higher Education through Distance Mode since 1971)



## Online Admission Prospectus 2013-14



43

Successful years in Distance Education

# अनुक्रमणिका


| अ. क्र. | तपशील | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| **विभाग एक** | | |
| १ | **प्रास्ताविक**<br>१.१ विद्यापीठाविषयी माहिती<br>१.२ दूर व मुक्त अध्ययन संस्थेविषयी माहिती<br>१.३ संस्थेची उद्दीष्टे<br>१.४ प्रमुख वैशिष्टये<br>१.५ सूचना पध्दती | ३ ते ४ |
| २ | **प्रवेश**<br>२.१ ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया :<br>२.२ सर्व अभ्यासक्रमाकरिता सर्वसाधारण आवश्यक कागदपत्रे<br>२.३ पात्रता प्रमाणपत्र (इतर राज्यातील बोर्डातून पास झालेल्या/व मुंबई विद्यापीठाव्यतिरिक्त असलेल्या विद्यार्थ्यांसाठी)<br>२.४ शिष्यवृती, फी माफी व पात्रता या घटकात मोडणा-या विदयार्थ्यांच्या प्रवेशा विषयी<br>२.५ प्रवेशकेंद्राविषयी<br>२.६ परीक्षा प्रवेशपत्र<br>२.७ अभ्यासक्रम परिचय सभेचे वेळापत्रक | ५ ते ८ |
| **विभाग दोन** | | |
| ३ | **कला व विज्ञान शाखेतील अभ्यासक्रम**<br>३.१ पदवी अभ्यासक्रम<br>३.१.१ प्रथम वर्ष<br>३.१.२ व्दितीय वर्ष<br>३.१.३ तृतीय वर्ष<br>३.२ पदव्युत्तर अभ्यासक्रम<br>३.२.१ एम.ए. भाग -१ व २<br>३.२.२ एम.ए. (शिक्षणशास्त्र) भाग - १ व २<br>३.२.३ एम.ए./एम.एस.सी. (गणित) भाग - १ व २ | ९ ते २१ |
| ४ | **वाणिज्य व्यवस्थापन शाखेतील अभ्यासक्रम**<br>४.१ पदवी अभ्यासक्रम<br>४.१.१ प्रथम वर्ष<br>४.१.२ व्दितीय वर्ष<br>४.१.३ तृतीय वर्ष<br>४.२ पदव्युत्तर अभ्यासक्रम<br>४.३ व्यवस्थापन अभ्यासक्रम<br>४.३.१ पी.जी.डी.एफ.एम.<br>४.३.२ पी.जी.डी.ओ.आर.एम. | २२ ते २७ |

| **विभाग तीन** | | |
|---|---|---|
| ५ | **नियम, नियमावली आणि सेवा व सुविधा**<br>**५.१ राखीव संवर्गातील विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती व फ्रीशीप (प्रवेश शुल्क माफी) योजना**<br>५.२ सहाय्यक सेवा<br>५.२.१ मार्गदर्शनपर व्याख्यानांची माहिती (पी.सी.पी )<br>५.२.२ ग्रंथालय सुविधा<br>५.२.३ अभ्यासक्रम व जुन्या प्रश्नपत्रिका<br>५.२.४ स्टुडिओ, अभासी वर्ग व दृक्श्राव्य केंद्र | २८ ते २९ |
| अ. क्र. | तपशील नाव | पृष्ठ क्र. |
| ६ | ६.३ संस्थेचे विविध नियम<br>६.३.१. प्रवेश रद्द व प्रवेश शुल्काचा परतावा<br>६.३.२. नाव/पत्ता/विषय बदल<br>६.३.३. ओळखपत्र/गुणपत्रिका व सत्यताप्रमाणपत्र<br>६.३.४. परीक्षा<br>६.३.५. परीक्षा शुल्क परतावा<br>६.३.६. स्थानांतर प्रमाणपत्र (टिसी) व स्थलांतर प्रमाणपत्र<br>६.३.७. बनावट प्रमाणपत्राच्या आधारे प्रवेश घेणा-यावर कारवाई<br>६.३.८. अभ्यासक्रमाची कालमर्यादा<br>६.३.९. दीक्षान्त/पदवी प्रमाणपत्र<br>६.३.१०. उत्तीर्ण संबंधीचे नियम (प्रथम वर्ष कला व वाणिज्य)<br>६.३.११. उत्तीर्ण संबंधीचे नियम (तृतीय वर्ष कला व वाणिज्य)<br>६.३.१२. उत्तीर्ण संबंधीचे नियम (एम.ए./एम.एस्सी (गणित)<br>६.३.१३. स्वयं अध्ययन तंत्र | ३० ते ३५ |

# १. प्रास्ताविक

## १.१ मुंबई विद्यापीठाविषयी:

मुंबई विद्यापीठ हे भारतातील सर्वात जुने व महत्वाचे विद्यापीठ आहे. या विद्यापीठाची स्थापना १८ जुलै १८५७ रोजी झाली. भारतातील प्रथम सूरु झालेल्या तीन विद्यापीठापैकी हे एक विद्यापीठ आहे तर कलकत्ता व मद्रास ही बाकीची दोन विद्यापीठे आहेत. मुंबई विद्यापीठास **नॅक** या संस्थेकडून 'अ' श्रेणीमध्ये पुनर्मानांकन मिळाले असून विद्यापीठ अनुदान आयोगाकडून **श्रेष्ठत्व-सक्षम विद्यापीठ** असा बहुमान देण्यात आलेला आहे.

जगातील उत्कृष्ट ५०० विद्यापीठामध्ये या विद्यापीठाची गणना करण्यात आलेली आहे. तसेच आशियामध्ये मुंबई विद्यापीठ ९६ स्थानावर आहे.

मुंबई विद्यापीठाचे दोन कॅम्पस आहेत. यातील विद्यानगरी, कालीना, सांताक्रूझ येथे २३० एकर तर फोर्ट येथे १३ एकरचा कॅम्पस आहे.

विद्यापीठाशी संलग्नीत असे ६६९ महाविद्यालये असून विद्यापीठात ५५ पदव्युत्त्र विभाग कार्यरत असून संपूर्ण विद्यापीठातील शिक्षण घेणा-या विद्यार्थ्यांची संख्या ६.५ लाख आहे.

विद्यापीठ अनेक व्यावसायिक अभ्यासक्रम चालवित असून त्यानिमिताने अनेक उद्योगांशी सहकार्याचे संबंध आहेत. तसेच विद्यापीठ हे राष्ट्रीयस्तरावर क्रीडा, सांस्कृतिक व इतर अनेक क्षेत्रामध्ये अग्रेसर आहे.

## १.२ दूर व मुक्त अध्ययन संस्थेविषयी

मुंबई विद्यापीठाने २४ मार्च १९७१ मध्ये **पत्राव्दारे अभ्यासक्रम संचालनालय** सुरु केले. १९८५ मध्ये या संचालनालयाचे नाव बदलून **दूरशिक्षण संचालनालय** केले. यानंतर १९९३ मध्ये दूरशिक्षण संचालनालयाचे नाव **दूरशिक्षण संस्था** असे करण्यात आले व त्यानंतर २००९ मध्ये दूरशिक्षण संस्थेचे नामकरण **दूर व मुक्त अध्ययन संस्था** असे करण्यात आले. अनेक पारंपारिक अभ्यासक्रमाबरोबरच तांत्रिक व व्यावसायिक अभ्यासक्रमही संस्था सुरु करणार असून मानवी साधनसंपत्तीच्या विकासाला महत्व देणार आहे. या व्यतिरिक्त जवळपास १५०० बाहेरील प्राध्यापक परीक्षा, समुपदेशन आणि इतर शैक्षणिक कामात संस्थेला सहकार्य करतात.

पारंपारिक विद्यापीठामध्ये दूरशिक्षणाव्दारे शिक्षण देणारी ही भारतातील सातवी संस्था आहे.

प्रारंभी ८४५ विद्यार्थ्यांपासून सुरुवात झालेली ही संस्था आज ८०,००० विद्यार्थ्यापर्यंत पोहोचली आहे.

विद्यार्थी गुणवत्तेमध्येही कमी नाहीत. दरवर्षी संस्थेचे विद्यार्थी गुणवत्ता यादीत येत असतात व सुवर्णपदकही पटकावित असतात. आजवर एम.ए.-संस्कृत, मराठीमध्ये सुवर्णपदक मिळविले आहे. एम.ए. हिंदीमध्ये तर कुलपती पदकही मिळालेले आहे. एम कॉममध्येही सुवर्णपदक मिळविणारे दरवर्शी अनेक विद्यार्थी आहेत. बी.ए., बी. कॉम., एम.ए., एम.कॉम. मध्ये प्रथम श्रेणीमध्येही अनेक विद्यार्थी येतात. संस्थेचे अनेक विद्यार्थी उच्चशिक्षणासाठी दरवर्षी ऑस्ट्रेलिया, अमेरिका, इंग्लंड, कॅनडा, न्युझीलंड इत्यादी देशात जातात. साहित्य, कला, चित्रपट, पत्रकारिता अशा अनेक क्षेत्रातील मान्यवर देखील संस्थेच्या माध्यमातून शिक्षण घेतात.

## १.३ उद्दीष्टे:

संस्थेचे उद्दीष्टे खालीलप्रमाणे आहेत.

१. नोकरी करणा-या व्यक्ती, विद्यार्थी व महिला यांना उच्चशिक्षणाची संधी देणे, ज्यांना आपली शैक्षणिक पात्रता वाढवायची आहे व विविध क्षेत्रातील ज्ञान ग्रहण करावयाचे आहे, त्यांना संधी देणे.

२. समाजातील गरीब व गरजू विद्यार्थ्यांना शिक्षण देणे.

३. विद्यार्थ्यांला त्याच्या अविरत शिक्षणासाठी व त्याच्या शैक्षणिक उन्नतीसाठी उच्चशिक्षणाची मदत करणे.

४. शिक्षण ही एक जीवनातील निरंतर चालणारी प्रक्रिया आहे. याचा विकास करणे जेणे करुन तो व्यक्तीश: त्याचे ज्ञान सतत अद्ययावत ठेवेल व तो ज्ञानाची नवनवीन क्षेत्रे वाढवील.

## १.४ विशेष वैशिष्टये:

१. संस्थेची ७७,००० स्क्वेअर फुटाचे स्वत:ची स्वतंत्र इमारत आहे.

२. अभ्यासक्रम,परीक्षा पध्दत व दिली जाणारी पदवी ही नियमित महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसारखीच आहे.

३. संस्थाकडून विद्यार्थ्यांस अभ्यासासाठी अभ्यासक्रमाचे मुद्रित अध्ययन साहित्य पुरविले जातात.

४. काही विषयासाठी ध्वनिचित्र फिती व इलेक्ट्रॉनिक्स साहित्यही उपलब्ध आहे.

५. संस्थेने अभासी अध्ययन वर्ग सुरु केले आहेत.

६. संस्थेचे स्वतंत्र ग्रंथालय असून दोन वाचन कक्ष आहेत. ग्रंथालयात जवळपास ४१ हजार पुस्तके असून विविध विषयावरील राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय नियतकालिकेही उपलब्ध आहेत.

७. व्यक्तिगत मार्गदर्शनपर व्याख्यानांचे वर्ग मुंबई व कोकणातील जिल्हयामधील ६० पेक्षा जास्त महाविद्यालयातून दरवर्शी आयोजित केले जातात

८. कार्यालयीन वेळेत संस्थेतील प्राध्यापकांमार्फत काही विषासंदर्भात मार्गदर्शन व समुपदेशन केले जातात.

## १.५ सूचना पध्दती:

दूर व मुक्त अध्ययन संस्थेची अध्ययन पध्दत नियमित महाविद्यालये व विद्यापीठापेक्षा भिन्न आहे. ही पध्दत म्हणजे **विद्यार्थी केंद्रीत** असून शैक्षणिक अध्ययनाच्या प्रक्रियेत विद्यार्थी स्वत: सहभागी होतो. संस्थेचा अध्ययानामध्ये बहुमाध्यम दृष्टीकोन असतो.

१. मुद्रित अध्ययन साहित्य हे इंग्रजी भाषेमध्ये असून काही विषयाचे अध्ययन साहित्य मराठी भाषेत उपलब्ध आहे.
प्रश्नपत्रिका भाषेच्या विषयाखेरीज इंग्रजी व मराठी भाषेत छापल्या जातात. पदवी अभ्यासक्रमातील विद्यार्थी परीक्षेमध्ये इंग्रजी, मराठी, हिंदी व गुजराथी भाषेमध्ये उत्तर लिहू शकतो. तसे परीक्षा अर्जावर परीक्षेचे माध्यम नमूद केलेले असते.

२. विद्यार्थ्यांसाठी शिक्षकांचे व्यक्तिगत मार्गदर्शन व समुपदेशन महाविद्यालयातील **व्यक्तिगत संपर्क केंद्रावर व संस्थेच्या मुख्यालयातही केले जाते.** (संस्थेच्या शिक्षक विद्या विभागात खोली क्र. १०६-अ मध्ये दुपारी ३.०० ते ५.०० या कार्यालयीन वेळेत होते. दुसरा व चौथा शनिवार तसेच शासकीय सुट्टीचा दिवस सोडून)

# २.प्रवेश

## २.१ प्रवेश वेळापत्रक:

२८ जून, २०१३ ते १६ ऑगस्ट, २०१३

१९ ऑगस्ट, २०१३ ते ३१ ऑगस्ट, २०१३ (रु. १५०/- विलंब शुल्कासह.)

## २.२ ऑनलाईन प्रवेश

शैक्षणिक वर्ष २०१३-२०१४ पासून संस्थेच्या सर्व अभ्यासक्रमाचे प्रवेश ऑनलाईन प्रक्रियेव्दारे देण्याची सुविधा केलेली आहे. विदयार्थ्यांनी या करीता विदयापीठाच्या पुढील संकेत स्थळावर सविस्तर माहिती वाचून त्याप्रमाणे प्रवेश घ्यावा.

संकेतस्थळ %& www.mu.ac.in/idol  OR www.mahaonline.gov.in

**प्रवेश फी खालील पैकी कोणत्याही प्रकारे करता येईल.**

१)क्रेडिट / डेबिट कार्ड / नेट बँकिंग

२) बँक ऑफ महाराष्ट्राच्या चलनाद्वारे.

**(आयडॉलच्या अभ्यासक्रमांना क्रेडीट सिस्टम नाही)**

## ः विशेष सुचना ः

१. आयडॉलच्या सर्व अभ्यासक्रमांना प्रवेश घेणा-या विद्यार्थ्यांनी ऑनलाईन प्रमाणे प्रवेश घेतल्यानंतर सर्व आवश्यक मुळ कागदपत्रे SCAN करून प्रवेश अर्जासोबत ऑनलाईन प्रक्रियेद्वारे अपलोड करून प्रवेश घ्यावा. फीस सुध्दा ऑनलाईन पध्दतीने भरण्याची सुविधा उपलब्ध आहे. तसेच महाराष्ट्र बॅकेच्या चलनाद्वारे सुध्दा फी भरू शकता.

२. ऑनलाईन फॉर्म भरल्*यानंतर केवळ अभ्यास*साहित्य घेण्यासाठी विघापीठात आयडॉल बिल्डींग रूम.नं.005 मध्ये यावे.प्रवेश अर्जाची कोणतीही हार्डकॉपी कुठेही सादर करण्याची गरज नाही. SCAN केलेल्या *प्रमाणपत्राचे* ऑनलाईन छापणी केली जाईल व SMS द्वारे विद्यार्थ्यांना माहिती पुरविली जाईल.

३. विद्यार्थ्यांना आयकार्ड त्यांचे प्रवेश अर्जाचे ऑनलाईन तपासणी झाल्यान*तर ऑनलाईन पध्दतीद्वारे दिले* जातील.

४. मागासवर्गीय (SC/ST/OBC/SBC/VJNT) विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती व शुल्कमाफी योजना लागू आहे अशा विद्यार्थ्यांनी आवश्यक प्रमाणप्रत्रासह ऑनलाईन प्रक्रियेद्वारे फॉर्म भरून नंतर प्रवेश घ्यावा. *समाजकल्याण* विभाग, *महाराष्ट्र शासन संकेतस्थळ* ःwebside http://mahaeshchol.maharastra.gov.in या नंतर आवश्यक प्रमाणपत्र ऑनलाईन फॉर्म सोबत जोडून रूम.१०८अ,आयडॉल बिल्डींग, मुंबई विघापीठ, *वि*द्यानगरी, कलिना, सांताक्रुझ येथे सादर करावे (११ ते ४) या वेळेत.

## २.३ (अ) प्रवेशाकरिता सर्वसाधारण आवश्यक कागदपत्र (सर्व अभ्यासक्रमाकरिता)

*विद्यार्थ्यांनी ऑनलाईन प्रवेश घेतांना सर्व आवश्यक प्रमाणपत्रे गुणप्रत्रिका, बोर्ड प्रमाणपत्र, फोटो, सही, (डिग्री प्रमाणपत्र, अनुभव प्रमाणपत्र) नाहरकत प्रमाणपत्र लागु असल्यास SCAN करून ऑनलाईन सबमिट कराव्यात.*

१) जन्मतारखेच्या दाखल्याचे प्रमाणपत्र:

२) निवास स्थानाचा पुरावा:

४) प्रवेश घेताना मागील वर्षाच्या सर्व प्रयत्नाच्या गुणपत्रिका

५) इयत्ता १२ वी चे मुळप्रमाणपत्रक जोडावी. (केवळ प्रथम वर्ष कला व वाणिज्य करीता)

६) दूर व मुक्त अध्ययन संस्थेच्या जुन्या विद्यार्थ्याकरीता ओळखपत्राची एक छायाप्रत द्यावी.

7) मुंबई विद्यापीठाशी संलग्नीत असलेल्या महाविद्यालयामधुन दूर व मुक्त अध्ययन संस्थेत प्रवेश घेणा-या विद्यार्थ्यांसाठी चालू शैक्षणिक वर्षाचे ना हरकत प्रमाणपत्राची मुळ प्रत व सोबत तीन छायाप्रती द्याव्यात.

८) पदवी प्रमाणपत्राची एक छायाप्रत एम.ए./एम.कॉम./एम.एस्सी. (गणित) भाग - १ प्रवेशाकरिता आवश्यक आहेत.

९) पीजीडीएफएम व पीजीडीओआरएम भाग-१ प्रवेशाकरिता दोन वर्षाच्या कामाचा अनुभव प्रमाणपत्राची आवष्यकता आहे.

## २.४ पात्रता प्रमाणपत्र: (इतर विद्यापीठे आणि सीबीएसई, एनआयओएस/इतर राज्याच्या बोर्डातील उमेदवारांकरिता)

इतर विद्यापीठातील विद्यार्थ्यांसाठी/व इतर राज्यातील बारावी बोर्डाच्या व सीबीएसई, एनआयओएस विद्यार्थ्यांसाठी मुंबई विद्यापीठा व्यतिरिक्त इतर विद्यापीठातील विद्यार्थी तसेच इतर राज्यातील बारावी बोर्ड, सीबीएसई, एनआयओएस. डी.एड. व एमएसबीटीई मधून उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना पुढील प्रवेशासाठी **प्रवेशापूर्वी पात्रता प्रमाणपत्र** संस्थेतील पात्रता प्रमाणपत्र विभाग, खोली क्र. १०८ मध्ये मिळेल. अशा विद्यार्थ्यांनी प्रवेश अर्ज घेतल्यानंतर अस्थायी पात्रता प्रमाणपत्रासाठी अर्ज करावा. हे प्रमाणपत्र मिळण्यास ८ ते १० दिवसाचा कालावधी लागतो. पात्रता प्रमाणपत्राशिवाय विद्यार्थ्यास संस्थेतील कोणत्याही अभ्यासक्रमामध्ये प्रवेश मिळणार नाही. पात्रता प्रमाणपत्रासाठी लागणारी आवश्यक कागदपत्रे: (सर्व कागदपत्रे स्वयंसाक्षांकित व दोन प्रतीत असावीत.)

१. दहावी / बारावी व त्यानंतरच्या सर्व प्रमाणपत्राच्या मूळ व दोन छायाप्रती.
२. जन्म तारखेचे प्रमाणपत्र
३. निवासाच्या पुराव्याचे कागदपत्रे
४. शिक्षणात खंड असल्यास त्याचे प्रमाणपत्र
५. स्थानांतर असल्यास स्थलांतर प्रमाणपत्र
६. पदवी प्रमाणपत्र

**सूचना**: १) पात्रता प्रमाणपत्र फी परतावा: ज्या विद्यार्थ्याना पात्रता प्रमाणपत्र मिळवण्यामध्ये अपयश आले असेल ते पात्रता फी परतावा करीता अर्ज करु शकतात.

२) कागदपत्रे छाननीची फीस इ. अतिरिक्त घेतली जाईल.

## २.४ शिष्यवृत्ती व फी माफी विषयांची योजना व नियम

जे मागासवर्गीय शिष्यवृत्ती व शिष्यवृत्ती व शुल्क माफी योजने करीता पात्र असतील अशा विद्यार्थ्यांना त्यांचे अर्ज Online पध्दतीने भरावयाचे आहे त्याकरीताा महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय विभागाच्या या mahaeschool.maharashtra.gov.in संकेत स्थळावर अर्ज करून त्या प्रत व आवश्यक कागदपत्र (मुळ कागदपत्रासह) व सांक्षाकित झेरॉक्स प्रतीसह खोली क्र. १०८ शिष्यवृत्ती व फी माफी विभाग, पहिला माळा , डॉ. शंकरदयालशर्मा भवन, येथे ११ ते ४ या वेळेत सादर करावयाचे आहेत. सदर मागासवर्गीय विद्यार्थी संवर्गातील (SC/ST/SBC/OBC/VJNT)असतील त्यांची फीस शिक्षणक्रमानुसार खालिलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १) F.Y./S.Y./B.A/B.Com/IT/Comp.Sc. | - | 380/- |
| २) T.Y.B.A./ B.Com /IT /Comp.Sc. | - | 630/- |
| ३) M.A./M.Com/M.Sc/IT/ Comp.Sc./Maths (I) | - | 780/- |
| ४) M.A./M.Com/M.Sc/IT/ Comp.Sc./Maths (II) | - | 1030/- |
| ५) M.C.A – I/II | - | 780/- |
| ६) M.C.A – III | - | 1030/- |

## २.५ परीक्षा प्रवेशपत्र:-

परीक्षा सुरु होण्याच्या चार दिवस अगोदर परींक्षा ओळखपत्र घेवून परीक्षेला बसणे हे विद्यार्थ्यांचे कर्तव्य आहे. परीक्षा ओळखपत्राशिवाय परिक्षेला बसु दिले जाणार नाही.

विदयार्थांनी आपले ओळखपत्र परीक्षेच्या पाच दिवस अगोदर पुढिल संकेत स्थळावरुन डाऊनलोड करुन परीक्षला जावे. संकेत स्तळ:

www.mu.ac.in/idol OR www.mahaonline.gov.in

## २.६ अभ्यासक्रम परिचय सभेचा कार्यक्रम:-

| अ. क्रमांक | शिक्षणक्रमाचे नाव | अभ्यासक्रम परिचय सभेची तारीख | वेळ | ठिकाण |
|---|---|---|---|---|
| १. | एम.ए. भाग - १ (शिक्षणशास्त्र) | नोव्हेंबर महिन्याचा पहिला शनिवार | ११.०० वा. | खोली क्रमांक ००६ दूर व मुक्त अध्ययन संस्था इमारत |
| २. | एम.ए. भाग - १ (इतिहास) | नोव्हेंबर महिन्याचा तिसरा शनिवार | ११.०० वा. | खोली क्रमांक २०६ दूर व मुक्त अध्ययन संस्था इमारत |
| ३. | एम.ए. भाग - १ (अर्थशास्त्र) | नोव्हेंबर महिन्याचा तिसरा शनिवार | ०२.०० वा. | खोली क्रमांक ००६ दूर व मुक्त अध्ययन संस्था इमारत |
| ४. | एम.ए. भाग - १ (इंग्रजी) | नोव्हेंबर महिन्याचा दुसरा शनिवार | ११.३० वा. | खोली क्रमांक ००६ दूर व मुक्त अध्ययन संस्था इमारत |
| ५. | एम.एस्सी. भाग - १ (गणित) | २१ ऑक्टोबर, २०१३ | ११.०० वा. | खोली क्रमांक २०७ दूर व मुक्त अध्ययन संस्था इमारत |
| ६. | पीजीडीओआरएम भाग - १ | नोव्हेंबर महिन्याचा तिसरा शनिवार | ११.०० वा. | खोली क्रमांक २०७ दूर व मुक्त अध्ययन संस्था इमारत |
| ७. | पीजीडीएफ्एम भाग - १ | नोव्हेंबर महिन्याचा दुसरा शनिवार | ०३.०० वा. | खोली क्रमांक २०८ दूर व मुक्त अध्ययन संस्था इमारत |

# ३. कला शाखेतील अभ्यासक्रम

## ३.१ पदवी अभ्यासक्रम:

पदवी (कला) या अभ्यासक्रमाचा कालावधी तीन वर्षाचा आहे.

### ३.१.१ प्रथम वर्ष कला अभ्यासक्रम

| अ. क्र. | विषयाचे नाव |
|---|---|
| १. | कम्युनिकेशन स्कील इन इंग्लिश |
| २. | अनिवार्य भाषा खालीलपैकी एक अ) मराठी (सुधारीत)<br>ब) हिंदी<br>क) उर्दू (विना अभ्यास साहित्य) |
| ३. | फाउंडेशन कोर्स पेपर - १ |

**ऐच्छिक विषय - एकूण तीन**

प्रथम वर्ष (कला) साठी खालीलपैकी तीन ऐच्छिक विषय काळजीपूर्वक निवडावेत. हे तीन विषय व्दितीय वर्श कला मध्ये पेपर क्र. २ व ३ असतील तर तृतीय वर्श कलामध्ये याच विषयामधून दोन निवडले तर कॉम्बीनेशनमध्ये प्रत्येकी तीन-तीन पेपर असतील किंवा संपूर्ण एक विषय निवडला तर सहा पेपर असतील.

खालीलपैकी सामाजिक शास्त्र गट - १ या समूहामधून दोन किंवा एक विशय निवडावेत आणि सामाजिक शास्त्र गट-२ मधून एक विषय निवडावा.

**किंवा**

ऐच्छिक भाषा समूह मधून एक विषय निवडावा किंवा सामाजिक शास्त्र गट-१ मधून एक विषय निवडावा आणि सामाजिक शास्त्र गट-२ मधून एक ऐच्छिक भाषा समूह मधून एक विषय निवडावा.

**गट-१ सामाजिक शास्त्रे (यामधून कोणतेही १ किंवा २ किंवा ३ विषय निवडावेत.)**

**(अभ्यास साहित्य उपलब्ध आहे.)**

| अ. क्र. | विषयाचे नाव |
|---|---|
| ४. | मानसशास्त्र पेपर-१ (सामान्य मानसशास्त्र) |
| ५. | अर्थशास्त्र पेपर-१ (सैध्दांतिक अर्थशास्त्र) |
| ६. | इतिहास पेपर-१ आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास (१९४८ ते १९६०) |
| ७. | समाजशास्त्र पेपर-१ (पायाभूत समाजशास्त्र) |
| ८. | राज्यशास्त्र पेपर-१ (राज्यशास्त्राची ओळख) |
| ९. | वाणिज्य पेपर-१ (वाणिज्यशास्त्र परिचय ) |

**गट - २ सामाजिक शास्त्रे**

| अ. क्र. | विषयाचे नाव |
|---|---|
| १०. | तत्वज्ञान पेपर-१ (नैतिक तत्वज्ञान)<br>किंवा<br>ग्रामीण विकास पेपर - १ ग्रामिणविकासाची तोंड ओळख (अभ्यास साहित्य मराठीत उपलब्ध आहे)<br>किंवा<br>शिक्षणशास्त्र पेपर - १ (शिक्षणशास्त्राची मूलतत्वे) |

भाषासमूह गट (ऐच्छिक भाषा) (कोणताही एक) १. मराठी (सुधारीत) २. हिंदी ३. इंग्रजी

**सूचना: ऐच्छिक भाषा विषयास अध्ययन साहित्य उपलब्ध नाही.**

## ३.१.२ व्दितीय वर्ष कला अभ्यासक्रम

एकूण गुण - ८००, एकूण-८ पेपर

**क)** **विषय:**

### अनिवार्य विषय

(अभ्यास साहित्य उपलब्ध आहे)

| अ. क्र. | विषयाचे नाव |
|---|---|
| १. | फाउंडेशन कोर्स पेपर -२ (सुधारीत) |
| २. | उपयोजित घटक गट (कोणतेही एक) |
| | अ) पत्रकारीता |
| | ब) व्यावसायिक संप्रेषण (अभ्यास साहित्य फक्त इंग्रजीत उपलब्ध आहे) (सुधारीत) |
| | क) जाहिरात कला |

### ऐच्छिक विषय: प्रथम वर्ष (कला) घेतलेले तीन विषय निवडावेत

(अभ्यास साहित्य उपलब्ध आहे)

| अ. क्र. | विषयाचे नाव |
|---|---|
| ३. | मानसशास्त्र<br>पेपर-२ सामाजिक मानसशास्त्र<br>पेपर-३ विकसित मानसशास्त्र |
| ४. | तत्वज्ञान (सुधारीत)<br>पेपर-२ सामाजिक आणि राजकीय तत्वज्ञान<br>पेपर-३ भारतीय आणि पाश्चिमात्य तत्वज्ञान |
| ५. | अर्थशास्त्र (सुधारीत)<br>पेपर-२ समग्रलक्षी अर्थशास्त्र<br>पेपर-३ भारतीय अर्थशास्त्र |
| ६. | इतिहास (सुधारीत )<br>पेपर-२ जगाच्या इतिहासातील महत्वाचे टप्पे (१३००ते १९४५ )<br>पेपर-३ प्राचीन भारत (१००० पर्यंत) |
| ७. | समाजशास्त्र (सुधारीत)<br>पेपर-२ भारतीय समाजशास्त्र आणि विकासाचे समाजशास्त्र<br>पेपर-३ मानवी विकासाचा आलेख आणि भारतीय नागरी समकालीन समस्या |
| ८. | राज्यशास्त्र(सुधारीत)<br>पेपर-२ भारतीय राजकीय व्यवस्था<br>पेपर-३ लोक प्रशासन |
| ९. | वाणिज्य<br>पेपर-२ वित्त व्यवस्थापन<br>पेपर-३ विपणनाची ओळख |
| १०. | ग्रामीण विकास (अध्ययन साहित्य फक्त मराठीत उपलब्ध )<br>पेपर-२ ग्रामीण समाज आणि ग्रामीण विकासाचे उपक्रम<br>पेपर-३ ग्रामीण प्रशासन आणि ग्रामीण विकासासंबंधी कायदे |

| | |
|---|---|
| ११. | शिक्षण शास्त्र(सुधारीत)<br>पेपर-२ शैक्षणिक मानसशास्त्र<br>पेपर-३ मार्गदर्शन व समुपदेश |
| १२. | इंग्रजी (ऐच्छिक) (सुधारीत)<br>पेपर-२ इंडियन लिटरेचर<br>पेपर-३ अमेरिकन लिटरेचर |
| १३. | मराठी (ऐच्छिक) (सुधारीत)<br>पेपर-२ कादंबरी (गोतावळा आणि रोबो ) आणि प्रवासवर्णन (तोकोनोमा आणि घाट शिळेवर उभी)<br>पेपर-३ भाषा विज्ञान आणि वैचारीक गद्य |
| १४. | हिंदी (ऐच्छिक) (सुधारीत)<br>पेपर-२ प्रातिनिधीक कविताएॅ<br>पेपर-३ आधुनिक गद्य |
| १५. | उर्दू (ऐच्छिक) (सुधारीत)<br>पेपर-२<br>पेपर-३ |

## ई) व्दितीय वर्ष कलासाठी उत्तीर्णतेचा नियम:

**आर.१८७६:** व्दितीय वर्ष कला परीक्षेमध्ये उत्तीर्ण होण्यासाठी प्रत्येकी १०० गुणाचे पेपर-१ व २ मध्ये प्रत्येकी ३५ टक्के गुण मिळविणे आवष्यक आहे. तसेच एका विषयामध्ये कमीत कमी २० टक्के गुण मिळाल्यास दोन्ही पेपरमध्ये २०० पैकी ७० टक्के गुण मिळणे आवष्यक आहे.

## ऐटीकेटी व तृतीय वर्ष कलामध्ये प्रवेशाचा नियम

**नियम ०.२२१७-** तृतीय वर्ष कलामध्ये प्रवेश घेण्यासाठी विद्यार्थी प्रथम वर्ष कला व व्दितीय वर्ष संपूर्णपणे उत्तीर्ण असणे आवष्यक आहे किंवा मुंबई विद्यापीठातील विद्यार्थी प्रथम वर्ष कला उत्तीर्ण व व्दितीय वर्ष कलामध्ये दोन विषयापेक्षा (३०० गुणांचे) जास्त विषयामध्ये अनुत्तीर्ण नसावा. अनुत्तीर्ण असलेले विषय तृतीय वर्ष कला परीक्षेसोबत किंवा त्यापूर्वीच्या परीक्षेमध्ये उत्तीर्ण करणे आवष्यक आहे. अन्यथा तृतीय वर्ष कलाचा निकाल जाहीर केला जाणार नाही.

किंवा मुंबई विद्यापीठातील विद्यार्थी जर प्रथम वर्ष कला परीक्षेमध्ये जास्तीत जास्त २ विषयात अनुत्तीर्ण असेल व व्दितीय वर्ष-कला मधील संपूर्ण विषयात उत्तीर्ण असेल तर व्दितीय वर्ष कलाचा निकाल जाहीर केला जात नाही. अशा विद्यार्थ्यांस तृतीय वर्ष कलामध्ये प्रवेश दिला जातो. परंतु जोपर्यंत तो प्रथम वर्ष कला परीक्षा उत्तीर्ण होत नाही, तोपर्यंत त्याचा तृतीय वर्ष कलाचा निकाल जाहीर केला जात नाही.

## ३.१.३ तृतीय वर्ष कला अभ्यासक्रम

**एकूण गुण-६०० एकूण पेपर-६** (सर्व विषयांचा जुना अभ्यासक्रम)

**क) विषय:** एकूण ६ पेपर, एकूण गुण-६०० अध्ययन साहित्य उपलब्ध (इंग्रजीत व मराठीत )

| **अ. क्र.** | **विषयाचे नाव** |
|---|---|
| १. | कॉमर्स (३ पेपर) |
| | पेपर-४ व्यवस्थापनाची ओळख<br>पेपर-५ मानवी संशोधन व्यवस्थापन<br>पेपर-६ निर्यात व्यवस्थापन |
| २. | समाजशास्त्र (३ पेपर ४, ५ व ६ किंवा ६ पेपर ४ ते ९)<br>अभ्यासक्रम |
| | पेपर-४ सामाजिक सिध्दांत<br>पेपर-५ कार्याचे समाजशास्त्र<br>पेपर-६ लिंग आणि समाज<br>पेपर-७ नागरी समाज शास्त्र<br>पेपर-८ मानवसंसाधन व विकासाचे समाजशास्त्र<br>पेपर-९ संशोधन पध्दती |
| ३. | इतिहास (३ पेपर- ४ ते ६ किंवा ६ पेपर-४ ते ९) |
| | पेपर-४ मध्ययुगीन भारताचा इतिहास (१००० ते १७०७)<br>पेपर-५ आधुनिक भारताचा इतिहास (१८५७-१९८४)<br>पेपर-६ पुरातत्व शास्त्र, वास्तुसंग्रहालय आणि ग्रंथालय शास्त्र<br>पेपर-७ मराठयांचा इतिहास (१६०० ते १८१८)<br>पेपर-८ समकालीन जग (१९४५-२०००)<br>पेपर-९ संशोधन पध्दतीतील घटक |
| ४. | शिक्षणशास्त्र (३ पेपर फक्त) |
| | पेपर-४ भारताची शिक्षण व्यवस्था, रचना आणि समस्या<br>पेपर-५ शिक्षणातील संप्रेशण<br>पेपर-६ शैक्षणिक मूल्यमापन |
| ५. | मानसशास्त्र (३ पेपर फक्त) |
| | पेपर-४ मानसशास्त्रातील चाचण्या आणि संख्याशास्त्र<br>पेपर-५ अपवादात्मक मानसशास्त्र<br>पेपर-६ औद्योगिक आणि संघटनात्मक मानसशास्त्र |
| ६. | अर्थशास्त्र (३ पेपर-४ ते ६ किंवा ६ पेपर-४ ते ९ |
| | पेपर-४ प्रगत आर्थिक सिध्दांत<br>पेपर-५ वाढ आणि विकास<br>पेपर-६ भारतीय अर्थव्यवस्था<br>पेपर-७ संशोधन पध्दती<br>पेपर-८ आंतरराष्ट्रीय अर्थशास्त्र<br>पेपर-९ निर्यात व्यवस्थापन |
| ७. | इंग्रजी साहित्य (३ पेपर फक्त) |
| | पेपर-४ ब्रिटीश लिटरेचर फॉर्म (१५५० - १७५०)<br>पेपर-५ इंग्लिश लॅंग्वेज ॲन्ड लिटेररी क्रिटीसीझम<br>पेपर-६ थिअरी ॲन्ड प्रॅक्टीस ऑफ ट्रान्सलेशन |

| अ. क्र. | विषयाचे नाव |
|---|---|
| ८. | मराठी साहित्य (३ पेपर - ४ ते ६ किंवा ६ पेपर-४ ते ९) |
| | पेपर-४ प्राचीन मराठी वाड्.मयाचा इतिहास (प्रारंभापासून १८१८ पर्यंत)<br>पेपर-५ साहित्यशास्त्र व साहित्य समीक्षा<br>पेपर-६ साहित्य व समाज (सुधारीत)<br>पेपर-७ भाषा विज्ञान परिचय आणि मराठी व्याकरणाची रुपरेखा<br>पेपर-८ लेखक अभ्यास - जयंत दळवी<br>पेपर-९ भाषांतर, रुपांतर, अनुवाद आणि वाड्.मयीन निबंध लेखन |
| ९. | ग्रामीण विकास ( ३ पेपर )(अभ्यास साहित्य फक्त मराठीतउपलब्ध ) |
| | पेपर-४ शेती आणि शेतीचे ग्रामिण विकासातील महत्व<br>पेपर-५ ग्रामिण विपणन आणि वित्त पुरवठा<br>पेपर-६ उपयोजित शेती |
| १०. | राज्यशास्त्र (तीन पेपर फक्त) |
| | पेपर-४ - महाराष्ट्रातील राजकीय प्रक्रिया<br>पेपर-५ - राजकीय विचार<br>पेपर-६ - समकालीन राजकारणातील महत्वाचे प्रश्न |
| ११. | हिंदी (फक्त ३ पेपर)<br>पेपर-४- हिंदी साहित्य का इतिहास<br>पेपर-५- स्वातंत्र्यत्तर हिंदी साहित्य<br>पेपर-६- प्रयोजन मुलक हिंदी . |

**सूचना:**

१) विद्यार्थ्यांनी जे विषय प्रथम वर्ष कला व व्दितीय वर्ष कलामध्ये घेतले असतील, तेच एक किंवा दोन विषय तृतीय वर्ष कलामध्ये निवडावेत.

२) तृतीय वर्ष कलाचे पेपर क्र.६ व ९चे गुण १०० आहेत व पेपरचा कालावधी ३ तासाचा आहे.

३) विद्यार्थ्यांस ऐच्छिक भाषा विषय एकापेक्षा जास्त घेता येणार नाही.

४) जे विद्यार्थी दोन विषय घेतील त्यांनी फक्त पेपर क्र. ४, ५ व ६ निवडावेत.

## ३.२ पदव्युत्तर अभ्यासक्रम

०.२२३८: पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाचा कालावधी दोन वर्षांचा राहील. (सर्व विषयांचा जुना अभ्यासक्रम)

### ३.२.१ एम.ए. भाग-१ व एम.ए. भाग-२

### क) एम.ए. भाग १ व २ विषय:

**मराठी (अभ्यास साहित्यासह)**

| एम.ए. भाग-१ | अभ्यासपत्रिका नाव | एम.ए. भाग-२ | अभ्यासपत्रिका नाव |
|---|---|---|---|
| *अ-१ | साहित्य प्रकाराचा अभ्यास (सुधारीत )(कथा) | अ-२ | प्राचीन कालखंडाचा अभ्यास-(बहामणीकाळ) |
| अ-३ | मराठी वाड.मयाचा इतिहास (१८४७-१९६०) | अ-४ | साहित्यशास्त्र |
| अ-५ | मराठीचा भाषा वैज्ञानिकअभ्यास | अ-६ | उपयोजित समीक्षा |
| अ-७ | आधुनिक गद्य आणि पद्य अभ्यास १९६० नंतर | अ-८ | लोक साहित्य<br>किंवा<br>दलित साहित्य |

**समाजशास्त्र (अभ्यास साहित्यासह)** (इंग्रजी व मराठीत)

| एम.ए. भाग-१ | अभ्यासपत्रिका नाव | एम.ए. भाग-२ | अभ्यासपत्रिका नाव |
|---|---|---|---|
| अ-१ | समाजशास्त्राचा सैध्दांतिक दृष्टीकोन | अ-५ | उद्योग कामगार आणि समाज |
| अ-२ | सैध्दांतिक मानववंशशास्त्र | अ-६ | पर्यावरण आणि समाज |
| अ-३ | विकासाचे समाजशास्त्र | अ-७ | समाजिक चळवळीचे समाजशास्त्र |
| अ-४ | भारतीय समाजाचा दृष्टीकोन | अ-८ | लिंग आणि समाज |

**इतिहास (अभ्यास साहित्यासह)** (इंग्रजी व मराठीत)

| एम.ए. भाग-१ | अभ्यासपत्रिका नाव | एम.ए. भाग-२ | अभ्यासपत्रिका नाव |
|---|---|---|---|
| अ-१ | आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास (१८१८-१९२०) | अ-५ | ऐतिहासिक लेखन पध्दती आणि इतिहासाचे तत्वज्ञान |
| अ-२ | भारतीय राष्ट्रीय चळवळ (१८५८-१९४७) | अ-६ | २० व्या शतकातील अमेरिकेचा इतिहास |
| अ-३ | युरोपचा इतिहास (१७८९-१९१९) | अ-७ | बौध्द व जैन तत्वज्ञानाचा इतिहास (१००० पर्यंत) |
| अ-४ | चीनचा इतिहास (१९००-१९९२) | अ-८ | मराठयांचा सामाजिक, आर्थिक, प्रशासकीय इतिहास (१६३०-१८१८) |

## अर्थशास्त्र

| एम.ए. भाग-१ | अभ्यासपत्रिका नाव गट-१ | एम.ए. भाग-२ | अभ्यासप्रत्रिका नाव गट-१ (अभ्याससाहित्या शिवाय) |
|---|---|---|---|
| अ-१ | सुक्ष्म लक्षी अर्थशास्त्र* | अ-३ | विकासाचे अर्थशास्त्र |
| अ-२ | स्थुल अर्थशास्त्र** | अ-४ | लोकांचे अर्थशास्त्र |
| | **गट-२** | | **गट-२** |
| अ-१ | कृषी अर्थशास्त्र** | अ-२ | कृशी अर्थशास्त्र |
| अ-१ | औद्योगिक अर्थशास्त्र* | अ-२ | औद्योगिक अर्थशास्त्र* |

* अभ्यास साहित्य फक्त इंग्रजी मध्ये उपलब्ध आहे.

** अभ्याससाहित्य इंग्रजी व मराठीत उपलब्ध आहे.

## हिन्दी (अभ्याससाहित्ये के साथ)

| एम.ए. भाग-१ | अभ्यासपत्रिका नाम | एम.ए. भाग-२ | अभ्यासपत्रिका नाम |
|---|---|---|---|
| अ-१ | आधुनिक गद्य | अ-२ | आधुनिक हिन्दी काव्य |
| अ-३ | हिन्दी साहित्य का इतिहास | अ-४ | भाषा विज्ञान और भाषाशास्त्र |
| अ-५ | प्राचीन तथा मध्यकालीन हिंदी काव्य | अ-६ | साहित्य लेखन काव्यशास्त्र |
| अ-७ | प्रयोजन मुलक हिन्दी | अ-८ | जनसंचार माध्यम |

## इंग्रजी

| एम.ए. भाग-१ | अभ्यासपत्रिका नाव एम.ए.भाग-१ | एम.ए. भाग-२ | अभ्यासप्रत्रिका नाव एम.ए.भाग-१ |
|---|---|---|---|
| अ-१ | इंडियन लिटरेचर इन इंग्लीश १८२० नंतर (अभ्यास साहित्य उपलब्ध आहे.) | अ-५ | लिटररी थेअरी ॲन्ड क्रिटीसिझम (अभ्यास साहित्य उपलब्ध आहे.) |
| अ-२ | लिंग्वीस्टीक ॲन्ड स्टायलिस्टिक ॲनेलीसीस ऑफ टेक्स्ट (अभ्यास साहित्य उपलब्ध आहे.) | अ-६ | लिटरेचर ऑफ रोमॅंटिक ॲन्ड व्हिक्टोरीयन पिरीयड (अभ्यास साहित्य उपलब्ध नाही.) |
| अ-३ | लिटरेचर ऑफ इंग्लीश रिनायसेन्स ॲन्ड रेस्टोरेशन (अभ्यास साहित्य उपलब्ध नाही.) | अ-७ | ॲंग्लो आयेरिश लीटरेचर ऑफ द ट्वेन्टीएथ सेन्च्यूरी (अभ्यास साहित्य उपलब्ध आहे.) |
| अ-४ | ट्वेन्टीएथ अमेरीकन सेन्च्यूरी लिटरीचर (अभ्यास साहित्य उपलब्ध नाही.) | अ-८ | इंडियन लिटररी इन ट्रान्सलेशन (अभ्यास साहित्य उपलब्ध नाही.) |

### राज्यशास्त्र

| एम.ए. भाग-१ | अभ्यासपत्रिका नाव |
|---|---|
| | **गट क्र.१** (अनिवार्य) |
| अ-१ | पॉलिटिकल थिअरी<br>(अभ्यास साहित्य उपलब्ध आहे.) |
| अ-२ | सिलेक्टेड इशुज ॲन्ड थिम्स इन इंडियन पॉलिटिक्स<br>(अभ्यास साहित्य उपलब्ध नाही.) |
| | **गट क्र. २** इंडियन स्टडीज |
| अ-१ | फॉरेन पॉलिसी ॲन्ड डिपलोमॅसी विथ स्पेशल रेफरन्स टु इंडिया<br>(अभ्यास साहित्य उपलब्ध आहे.) |
| अ-२ | मॉर्डन इंडियन पॉलिटिकल थॉट (पेपर - १)<br>(अभ्यास साहित्य उपलब्ध आहे.) |

### गुजराती

| एम.ए. भाग-१ | अभ्यासपत्रिका नाव<br>(अभ्यास साहित्य उपलब्ध आहे.) | एम.ए. भाग-२ | अभ्यासपत्रिका नाम<br>(अभ्यास साहित्य उपलब्ध नाही.) |
|---|---|---|---|
| अ-१ | स्टडी ऑफ द पोस्ट - मॉर्डन टेक्स्ट | अ-२ | कमपॅरेटिव लिटरेचर |
| अ-३ | डिटेल्ड स्टडी ऑफ द ऑथर | अ-४ | इनट्रोडक्शन टु फिलॉसॉफी लिंग्वीस्टीक ॲन्ड गुजराती ग्रामर |
| अ-५ | लिटररी क्रिटीसिझम | अ-६ | डिटेल स्टडी ऑफ मेडीवल टेक्स्ट |
| अ-७ | स्टडी ऑफ अ फॉम | अ-८ | जरनालिझम ॲन्ड लिटररी रिसर्च ॲन्ड अनसिन |

## ३.२.३ एम.ए.भाग - १ शिक्षणशास्त्र

### ब) अभ्यासक्रमा विषयी:

विविध क्षेत्रातील शैक्षणिक उपक्रमांमधील परिणामकारक सहभागासाठी व्यावसायिक दृश्टीकोन घडवण्याच्या हेतुने एम.ए. (शिक्षण) हा पदव्युत्तर अभ्यासक्रम तयार केला आहे. विद्याशाखीय व व्यावसायिक बाजूंवर भर देणारा हा शैक्षणिक अभ्यासक्रम आहे. हयात ६ मूलभूत (आवश्यक) व २ पर्यायी (४ मधून निवडणे अपेक्षित) प्रष्नांचा समावेश आहे.

सदर तात्विक भागाशिवाय अंतर्गत मूल्यमापनाचा भाग म्हणून १६ स्वाध्याय (प्रत्येक प्रष्नपत्रास २ स्वाध्याय याप्रमाणेद्ध सादर करणे अपेक्षित आहे. UGC च्या अभ्यासक्रम विकसन केंद्राच्या मार्गदर्शक तत्वानुसार व इतर भारतीय विद्यापीठाच्या पदव्युत्तर अभ्यासक्रमाशी जुळणारा हा अभ्यासक्रम आहे. निवडलेल्या विषयाच्या व्यावसायिक गरजानुसार त्या विषयावर विशेष प्रभुत्व मिळवणे अपेक्षित आहे. शिक्षण एक मुक्त कला व व्यावसायिक कार्यक्रम म्हणून हा अभ्यासक्रम सादर करण्याचा मुख्य हेतू आहे.

धोरण निष्चिती करणे, शैक्षणिक बाबींच्या सामाजिक व सांस्कृतिक संदर्भात शिक्षणाकडे व्यासपीठ म्हणून पहाणा-या पदव्युत्तर पदवीधरांची फळी निर्माण करण्याचा मानस हया अभ्यासक्रमामुळे साध्य होईल. तसेच तो पूर्ण केल्यावर Ph.D

करुन ज्ञाननिर्मितीच्या दिशेने असा पदवीधर पुढे जाईल. NCTE us M.ED. ok MA ही एक अध्यापकाची गुणवत्ता म्हणून मान्य केली आहे. मुंबई विद्यापीठाच्या विध्दत परिशदेने एम.ए. शिक्षणशास्त्र हा अभ्यासक्रम शिक्षणशास्त्र महाविद्यालयाच्या अधिव्याख्याता पदासाठी पात्रता म्हणून स्विकारला आहे.

एम.एम. शिक्षणशास्त्र या अभ्यासक्रमाचा उददेश हा शैक्षणिक क्षेत्रातील वेगवेगळया उपक्रमात हिरीरीने सहभाग घेण्याकरिता आवष्यक आहे. शिक्षणामध्ये हा पदव्युत्तर अभ्यासक्रम एक नाविन्यपूर्ण असून तो दोन्ही विद्याशाखेवर भर देणारा आहे आणि शिक्षणामध्ये व्यावसायिक दिशा देणारा आहे.

या अभ्यासक्रमात सहा अभ्यासपत्रिका आहेत आणि दोन अभ्यासपत्रिका चार विकल्पापैकी निवडावयाच्या आहेत. म्हणजे दोन्ही भागाकरिता आठ अभ्यासपत्रिका असतील. सैध्दांतिक अभ्यासक्रमाव्यतिरिक्त विद्यार्थ्यांना सोळा स्वाध्याय प्रतिसादपत्र एका अभ्यासपत्रिकेसाठी दोन याप्रमाणे अंतर्गत मुल्यमापनासाठी सादर करावे.

**स्वाध्याय:**

प्रत्येक अभ्यासपत्रिकेत २ स्वाध्याय असतात, परंतु विद्यार्थ्यांना प्रत्येक भागासाठी सोळा स्वाध्याय सादर करावयाचे असतात. स्वाध्यायाकरिता एकूण गुणापैकी २० टक्के भर दिला जातो. स्वाध्यायासाठी २०११-१२ या शैक्षणिक वर्शाचे प्रष्न २०१२ मध्ये होणा-या व्दितीय सत्रासाठी लागू असतील.

* स्वाध्याय वेळेत सादर करणे गरजेचे व अनिवार्य आहे. याशिवाय विद्यार्थ्यांना विद्यापीठाच्या परिक्षेला बसता येणार नाही.
* स्वाध्यायामध्ये प्रत्येक अभ्यासपत्रिकेत २० पैकी कमीत कमी ५ गुण मिळणे आवष्यक आहे.
* जर आपण स्वाध्यायामध्ये ५ गुण मिळवू शकला नाही किंवा स्वाध्याय वेळेत सादर केले नसेल तर सदर विद्यार्थ्यांस पुढील वर्षीपर्यंत थांबून नव्याने स्वाध्याय सादर करावे लागेल.
* एकदा एका स्वाध्यामध्ये ५ गुण मिळाले असल्यास पुन्हा श्रेणी सुधारण्यासाठी स्वाध्याय सादर करता येणार नाही. स्वाध्याय पुर्ण मुल्यमापनाकरीता पाठविता येणार नाही.
* स्वाध्याय सादरकरणाची शेवटची तारीख प्रत्येकवर्षी ३१ जानेवारी असेल.

## ड) एम.ए.(शिक्षणशास्त्र) भाग-१

### स्वाध्यायाकरीता प्रश्न

**एम.ए. (भाग १) स्वाध्यायाकरीता प्रश्न**

**अभ्यासप्रत्रिका - १**

१.वर्तमान संदर्भातील शिक्षणाची कार्य स्पष्ट करा.

२.नागरिकत्व शिक्षणातील शिक्षकाची भूमिका स्पष्ट करा.

**अभ्यासप्रत्रिका - २**

१.अध्यापनाचे तत्वज्ञानात्मक आधाराची चर्चा करा.

२.बांदुराची सामजिक अध्ययन उपपत्ति विशद करा.

**अभ्यासप्रत्रिका - ३**

१.प्रभाववत प्रायोगिक अभिकल्पाचा प्रकार स्पष्ट करा.

२.संशोधन अहवाल लेखणाची चर्चा करा.

**अभ्यासप्रत्रिका - ४**

१.संस्थांच्या स्वायत्तेसाठी येणा-या अडचणी विशद करा.

२.अध्यापक शिक्षणाच्या संशोधनातील अडचणींची चर्चा करा.

# एम.ए. (शिक्षणशास्त्र) भाग-२
## अभ्यासपत्रिका ९

* स्वाध्यायाचे उत्तर हे कार्यालयाने वितरीत केलेल्या प्रतिसादपत्रावरच लिहावे. प्रत्येक विद्यार्थ्याला १२ पेजेसची ०४ रिस्पॉन्स शीट दिली जाईल.

* आपल्या प्रतिसादपत्रावरच पहिल्या पानावरील सर्व स्तंभ भरणे आवष्यक आहे. पोच पावती स्वाध्याय जमा करण्याच्या वेळी रुम क्र.२०१ मधून मिळेल.

* स्वाध्यायाचे उत्तर हे आपल्या स्वहस्ताक्षरात असावे. तुम्ही स्वयं अध्ययन साहित्यातील मजकूर किंवा वेगवेगळया स्तोत्रातून मिळविलेली माहिती नक्कल स्वरुपात नसावी. जेव्हा आपण एखादे वाक्य पुस्तकातून, मासिकातून किंवा लिखित दस्तऐवजातून कोट करता तेव्हा त्यांचा संदर्भ देणे आवष्यक आहे.

* सर्वस्वाध्यायांना आकर्शक प्रस्तावना व समर्पक सारांश असावा.

* तुमचे उत्तर व्यवस्थित, योग्य दस्ताऐवजासह आणि प्रश्नाला अनुसरुन असावे.

* तुमचे स्वाध्याय स्वहस्ताक्षरात लिहा. जर तुमचे हस्ताक्षर वाचण्या योग्य नसेल असे तुम्हाला वाटत असेल तर तुम्ही टंकलिखित प्रत सादर करा.

* कृपया आपल्या स्वाध्यायाची एक प्रत आपल्या जवळ ठेवा. जर पुन्हा सादर करण्याची वेळ आली किंवा ते हरवले किंवा टपालाने गहाळ झाले किंवा संस्थेकडून गहाळ झाले, तर ती प्रत तुम्हाला उपयोगी पडेल.

* आपले स्वाध्याय दिलेल्या मुदतीच्या आत सादर करावेत.

* सविस्तर अभ्यासक्रम अभ्यास साहित्यामध्ये दिलेला आहे.

# एम.ए.शिक्षणशास्त्र (भाग २)
स्वाध्यायाकरीता प्रश्न

**गट अ**

**अभ्यासप्रत्रिका - २ : शिक्षणाचे अर्थशास्त्र**

१. वर्तमान परिस्थितील शिक्षणाच्या अर्थशास्त्राची गरज स्पष्ट करा?

२.जागतिकीकरणाच्या संदर्भात शिक्षकाला शिक्षणांचे अर्थशास्त्र कसे मदत करते?

**अभ्यासप्रत्रिका - ४ : शिक्षणाचा इतिहास**

१.मक्ताबा आणि मदरसा यांची विशेष वैशिष्टे वर्णन करा?

२.राष्ट्रीय ज्ञान आयोगाची प्रमुख क्षेत्रे स्पष्ट करा?

**गट ब**

**अभ्यासप्रत्रिका - ८ : मार्गदर्शन आणि समुपदेशन**

१.मानसिक आरोग्याचा अर्थ आणि लक्षणे स्पष्ट करा?

२.मार्गदर्शनाचा अर्थ, तत्वे आणि व्याप्ती स्पष्ट करा?

**अभ्यासप्रत्रिका - १० ः मुक्त अध्ययन प्रणाली**

१.मुक्त अध्ययन प्रणालीचा अर्थ काय? मुक्त अध्ययन प्रणालीतील उदयोन्मुख प्रवाहाची चर्चा करा?
२.दूरस्थ अध्ययन कर्ताची वैशिष्टे स्पष्ट करा? अभ्यास साहित्य हे स्व-अध्ययन स्वरूपामध्ये का लिहावेत?

## फ) एम.ए. शिक्षणशास्त्र भाग १ व २:

अभ्याससाहित्य इंग्रजी व मराठीत उपलब्ध

| एम.ए. भाग-१ | अभ्यासपत्रिका नाव | एम.ए. भाग-२ | अभ्यासपत्रिका नाव |
|---|---|---|---|
| अ-१ | शिक्षणातील प्रगत तत्वज्ञान आणि समाजशास्त्र | ब-२ | शिक्षणाचे अर्थशास्त्र |
| | | ब-४ | शिक्षणाचा इतिहास |
| अ-२ | प्रगत शैक्षणिक मानसशास्त्र | ब-७ | महिती आणि संभाशण तंत्रज्ञान<br>या अभ्यासपत्रिकांचे स्वाध्याय (Assignments) Online आहेत. |
| अ-३ | शिक्षणातील संशोधन पध्दती | ब-८ | मार्गदर्शन आणि समुपदेशन |
| अ-४ | शिक्षकांचे शिक्षण | ब-१० | मुक्त दूरस्थ अध्ययन या अभ्यासपत्रिकांचे स्वाध्याय |

**सूचना:** परीक्षेची योजना% ८० गुण (बाहय), २० गुण (अंतर्गत मूल्यमापनद्ध अंतर्गत मुल्यमापनामध्ये एका अभ्यासपत्रिकेकरिता २ स्वाध्याय असतात. एका स्वाध्यायासाठी १० गुण. एकूण १६ स्वाध्यायाकरिता १६० गुण आहेत.

## ग) सहाय्यक सेवा:

एम.एम. शिक्षणशास्त्र अभ्यासक्रमासाठी वैयक्तिक मार्गदर्शन शिबीर कार्यक्रम:
विद्यार्थ्यांच्या हिताकरिता संस्था मुंबई परिसरात मार्गदर्शन व्याख्याने संध्याकाळी ६.०० ते ८.०० वा. किंवा रविवार व सार्वजनिक सुट्टीच्या दिवशी आयोजित करते, परंतु सदर व्याख्याने अनिवार्य नसतात. ती विद्यार्थ्यांच्या मार्गदर्शनाकरिता व त्यांच्या शैक्षणिक समस्या व अडचणी सोडविण्यासाठी असतात.

## वैयक्तिक मार्गदर्शन कार्यक्रम केंद्र

| अ.क्र. | महाविद्यालयाचे नाव व पत्ता | अ.क्र. | महाविद्यालयाचे नाव व पत्ता |
|---|---|---|---|
| १. | दूर व मुक्त अध्ययन संस्था,<br>मुंबई विद्यापीठ, डॉ. शंकर दयाळ शर्मा भवन,<br>विद्यानगरी, सांताक्रूझ (पूर्व), मुंबई. | २. | सेंट झेविअर इन्स्टीटयूट, न्यू मरीन लाईन,<br>चर्चगेट, मुंबई-४०० ०२०.<br>दूरध्वनी: ०२२-२२०१४६६६<br>समन्वयक: डॉ. ॲडलेड व्याज |
| ३. | मुंबई टिचर्स ट्रेनिंग कॉलेज<br>महाकवी भुशण रोड, कुलाबा,<br>मुंबई-४०० ०३७. फोन: ०२२-२२०४७१६०<br>समन्वयक: डॉ. मिंटू सिन्हा | ४. | चेंबुर कॉम्प्रेहेन्सीव कॉलेज व एज्यू. ॲन्ड<br>रिसर्च, रामकृश्ण चेंबूरकर मार्ग, नाका,<br>मुंबई-४०० ०७७.<br>समन्वयक: डॉ. जावळेकर |
| ५. | सेवासदन कॉलेज ऑफ एज्युकेशन,<br>उल्हासनगर-४२१ ००३.<br>दूरध्वनी: ९५२५१-२५४५५६५<br>समन्वयक: डॉ. बिना खेमचंदानी | ६. | सेकंडरी ट्रेनिंग कॉलेज<br>३, महापालिका मार्ग, धोबी तलाव,<br>मुंबई-४०० ००१.<br>दूरध्वनी: ०२२-२२६२००५०.<br>समन्वयक: डॉ. सुहास पाटील |
| ७. | गुरुकृपा कॉलेज ऑफ एज्युकेशन ॲंड रिसर्च<br>रामकृश्ण नगर, इ विंग, पूर्नीमा कॅम्पस,<br>मुरबाड रोड, कल्याण (प), जि. ठाणे,<br>दूरध्वनी: ९५२५१-२३२८४०६ | ८. | नवजीवन शिक्षण संस्थेचे शिक्षणशास्त्र<br>महाविद्यालय, नेरळ, जिल्हा रायगड, |
| ९. | श्रीमती कपिला खांडवाला कॉलेज ऑफ एज्यूकेश<br>जुहू रोड, सांताक्रूझ (प), मुंबई-४०० ०५४.<br>अभ्यासक्रम समन्वयक: प्राचार्य डॉ. वंदना<br>महेष्वरी ,दूरध्वनी: ०२२-२६६०८७४८ | १०. | साईनाथ एज्यूकेशन ट्रस्टचे<br>एच.बी.बी.एड्. कॉलेज, सेक्टर-१० अ,<br>वाशी, नवी मुंबई-४०० ७०३.<br>अभ्यासक्रम समन्वयक: प्राचार्य डॉ. स्वर्णलता<br>हरिचंदन |
| ११ | गुरूनानक कॉलेज ऑफ एज्युकेशन<br>भांडूप पश्चिम, मुंबई - ४०० ०७८ .<br>समन्वयक: प्राचाय किर्ती प्रधान | | |

सूचना: १) विद्यार्थ्यांना विनंती आहे की, त्यांनी विद्यापीठाच्या संकेत स्थळावर **www.mu.ac.in.idol** वर किंवा दूर व मुक्त अध्यान संस्थेच्या सूचना फलकावर वेळापत्रक पहाणे. २) या संदर्भात कोणताही स्वतंत्र पत्रव्यवहार होणार नाही.

## घ) एम.ए.भाग- १ व २ शिक्षणशास्त्र उत्तीर्ण होण्याचा दर्जा:

डमेदवारास सैध्दांतिक अभ्यासपत्रिकेमध्ये ८० पैकी २० गुण मिळणे आवष्यक आहे. प्रत्येक स्वाध्यायमध्ये २० पैकी ०५ गुण आणि १०० पैकी २५ एकत्रित गुण प्रत्येक सैध्दांतिक व स्वाध्यायामध्ये आणि ४० टक्के सरासरी गुण हे प्रत्येक भागाच्या परिक्षेसाठी आवष्यक आहे.

ज्या उमेदवारांना भाग १ व भाग २ ची परिक्षा यशस्वीरीत्या उत्तीर्ण केली असेल आणि कमीत कमी ६० टक्के एकूण गूण मिळविले असतील त्यांना प्रथम श्रेणी आणि ज्यांनी कमीत कमी ५० टक्के मिळविले असतील त्यांना व्दितीय श्रेणी देण्यात येईल.

**श्रेणी सुधारणा:**

**नियम ०.२२६०:** जे उमेदवार मुंबई विद्यापीठाच्या पदव्युतर पदवी परीक्षेत अभ्यासपत्रिकेत किंवा प्रकल्पात व्दितीय श्रेणी किंवा सर्वसाधारण उत्तीर्ण झालेले असतील त्यांना त्याच विशयात श्रेणी सुधारण्याकरिता मान्यता देण्यात येईल. दोन्ही भागाकरिता एकत्रित कोणत्याही अन्य सवलती शिवाय ५ वर्शाच्या कालावधीमध्ये पुढील एप्रिल किंवा ऑक्टोबर परीक्षेत जे ०.२२६० च्या नियमानुसार उत्तीर्ण झालेले असतील.

| स्तंभ १ | स्तंभ २ |
|---|---|
| उत्तीर्ण श्रेणी | अ) व्दितीय श्रेणी किंवा कमीत कमी ५५ टक्के गुण किंवा प्रथम श्रेणी |
| व्दितीय श्रेणी | ब) कमीत कमी ५५ टक्के गुण किंवा प्रथम श्रेणी |

जर उमेदवार वरील नियमानुसार पदव्युत्तर पदवी परीक्षेस बसलेला असेल व तो त्यांची श्रेणी सुधारण्यास अपात्र ठरला तर त्याचा हा प्रयत्न दुर्लक्षीत केला जाईल –

## ३.३ एम.ए./एम.एस्सी. (गणित) अभ्यासक्रम

### एम.ए./एम.एस्सी. (गणित) भाग-२

### एम.ए./एम.एस्सी. (गणित) भाग-१ व भाग-२ करिता विषय

### (अभ्यास साहित्या शिवाय)

| एम.एस्सी (गणित) भाग-१ | अभ्यासपत्रिकेचे नाव | एम.एस्सी (गणित) भाग-२ | अभ्यासप्रत्रिकेचे नाव |
|---|---|---|---|
| अ-१ | अलजेब्रा-१ | अ-१ | अलजेब्रा-२ |
| अ-२ | अनॅलेसिस-१ | अ-२ | अनॅलिसिस-२ |
| अ-३ | टोपोलॉजी या अभ्यासपत्रिकांचे अध्ययनसाहित्य अपलब्ध आहे. | अ-३ | डिफ्रन्सीएल जोमेट्री |
| अ-४ | कॉम्प्लेक्स ॲनॅलिसिस या अभ्यासपत्रिकांचे अध्ययनसाहित्य अपलब्ध आहे. | गट - अ | ग्राफ थेअरी |
| अ-५ | कॉब्मोनेटोरीज | गट - ब | न्यू मरीकल ॲनालिसेस |
| | | गट - क | १) फंक्शनल ॲनॅलिसेस किंवा<br>२) नंबर थेअरी |

*** अभ्यास साहित्य उपलब्ध आहे**

वैकल्पीक अभ्यासपत्रिका तीन गटात विभागण्यात आले आहे. गट अ, ब, क भाग - २ मध्ये अभ्यासक्रमासाठी अभ्यासपत्रिका क्र. ४ व ५ मध्ये प्रत्येक गटातून एक अभ्यासपत्रिका वैकल्पीकसाठी निवडणे.

# ४. वाणिज्य शाखेतील अभ्यासक्रम

वाणिज्य शाखेतील पदवी अभ्यासक्रमाचा कालावधी ३ वर्षाचा असेल.

## ४.१ प्रथम वर्ष वाणिज्य अभ्यासक्रम .

अभ्याससाहित्य इंग्रजी व मराठीत उपलब्ध आहे.

| अ.क्र. | विषयाचे नाव |
|---|---|
| १. | पायाभूत अभ्यासक्रम-भाग १ अभ्यासपत्रिका |
| २. | व्यावसायिक संप्रेशण(सुधारीत)<br>(अभ्यास साहित्य फक्त इंग्रजीत उपलब्ध आहे.) |
| ३. | व्यावसायिक अर्थशास्त्र - अभ्यासपत्रिका पेपर - १(सुधारीत)<br>(अभ्यास साहित्य फक्त मराठीत उपलब्ध आहे.) |
| ४. | वाणिज्य अभ्यासपत्रिका (व्यवसायाची ओळख) पेपर -१(सुधारीत) |
| ५. | पर्यावरणाचा शास्त्राचा अभ्यास |
| ६. | गणितसंबंधी आणि संख्याशास्त्राशी संबंधी तंत्रे<br>(अभ्यास साहित्य फक्त इंग्रजीत उपलब्ध आहे.) |
| ७. | लेखाकार्य अभ्यासपत्रिका (लेखा आणि आर्थिक व्यवस्थापन) (सुधारीत)<br>(अभ्यास साहित्य फक्त इंग्रजीत उपलब्ध आहे.) |

## ४.१.२. व्दितीय वर्ष वाणिज्य अभ्यासक्रम

**क) सर्व विषय अनिवार्य. एकूण ६ विषय. एकूण ६०० गुण.**

| अ.क्र. | विषयाचे नाव |
|---|---|
| १. | पायाभूत अभ्यासक्रम-भाग २ (सुधारीत) |
| २. | उपयोजि घटक गट (खालीलपैकी कोणताही एक)<br>अ) जाहिरात कला<br>किंवा<br>आ) कंपनी चिटणीसाचा व्यवहार |
| ३. | व्यवसायिक कायदे |
| ४. | व्यवसायिक अर्थशास्त्र-अभ्यासपत्रिका २ |
| ५. | वाणिज्य-अभ्यासपत्रिका २<br>२ (विपणन आणि वित व्यवस्थापनाची मुलतत्वे) |
| ६. | लेखा आणि आर्थिक व्यवस्थापन अभ्यासपत्रिका २ (अभ्यास साहित्य फक्त इंग्रजीत उपलब्ध आहे.) |

**ड) व्दितीय वर्ष वाणिज्य - उत्तीर्ण होण्यासाठी लागणा-या गुणांचे प्रमाण:**

R१८८२: व्दितीय वर्ष वाणिज्य परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठी परीक्षेस असलेल्या प्रत्येक विषयात १०० पैकी ३५ गुण मिळणे आवष्यक आहे.

अनुत्तीर्ण परीक्षार्थीला अशा प्रकारे एखाद्या विशयात उत्तीर्ण होण्यात जे कमीत कमी गुण मिळविणे आवष्यक आहेत ते गुण मिळाल्यास तो त्याच्या इच्छेप्रमाणे तद्नंतर होणा-या परीक्षेत त्या विषयात सुट घेवू शकतो आणि असा परीक्षार्थी राहलेल्या अनुत्तीर्ण विषयात उत्तीर्ण झाल्यावर संपूर्ण परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे जाहिर होते.

O.२२२१ -ब: तृतीय वर्ष वाणिज्य अभ्यासक्रमासाठी विद्यार्थी पुढीलप्रमाणे पात्र ठरेल: (१) प्रथम व व्दितीय वर्ष वाणिज्य परीक्षा सर्व विषयात उत्तीर्ण असल्यास, (२) प्रथम वर्ष वाणिज्य परीक्षा सर्व विषयात उत्तीर्ण आणि व्दितीय वर्ष वाणिज्य परीक्षेच्या ६ पैकी २ पेक्षा जास्त विषयात अनुत्तीर्ण न झाल्यास, अशा विद्यार्थ्याला व्दितीय वर्ष वाणिज्य परीक्षेत अनुत्तीर्ण झालेल्या विषयांस बसून उत्तीर्ण व्हावे लागेल. तोपर्यंत त्याचा तृतीय वर्ष वाणिज्य परीक्षेचा निकाल जाहीर केला जाणार नाही.

तसेच जो परीक्षार्थी प्रथम वर्ष वाणिज्य परीक्षेस २ पेक्षा जास्त विषयात अनुत्तीर्ण नाही आणि व्दितीय वर्ष वाणिज्य परीक्षेत सर्व विषयात उत्तीर्ण असून ज्याचा व्दितीय वर्षाचा निकाल राखून ठेवला आहे अशा विद्यार्थ्याला तृतीय वर्ष वाणिज्यला प्रवेश घेता येईल, परंतु अशा परीक्षार्थीचा तृतीय वर्षाचा निकाल प्रथम वर्षाचे राहिलेले विषय उत्तीर्ण झाल्याशिवाय जाहिर केला जाणार नाही.

(मूळ इंग्रजीमधील सविस्तर नियम पाहावेत.)

## ४.१.३ तृतीय वर्ष वाणिज्य अभ्यासक्रम

**क) विषय : एकूण ७ विषय - एकूण ७०० गुण.**(अभ्यास साहित्य फक्त इंग्रजीत उपलब्ध आहे.)

| **अ.क्र.** | **विषयाचे नाव** |
|---|---|
| १. | वाणिज्य - अभ्यासपत्रिका ३- व्यवस्थापन आणि उत्पादन नियोजन<br>(अभ्यास साहित्य इंग्रजी/मराठी उपलब्ध आहे.) |
| २. | व्यवसायिक अर्थशास्त्र-अभ्यासपत्रिका ३ (अभ्यास साहित्य इंग्रजी/मराठी उपलब्ध आहे.) |
| **३.** | **लेखा गट** |
| १. | आर्थिक लेखाकार्य आणि हिशोब तपासणी<br>अभ्यासपत्रिका-१ (आर्थिक हिशोब) |
| | |
| २. | आर्थिक लेखाकार्य आणि हिशोब तपासणी<br>अभ्यासपत्रिका-२ (हिशोब तपासणी आणि मूल्यमापन) |
| ३. | आर्थिक लेखाकार्य आणि हिशोब तपासणी<br>अभ्यासपत्रिका-३ (आर्थिक व्यवस्थापनाची ओळख) (अभ्यास साहित्य इंग्रजी व मराठीत उपलब्ध आहे.) |
| **किंवा** | **व्यावसायिक व्यवस्थापन गट** |
| १. | व्यवस्थापन आणि संघटनात्मक प्रगती/विस्तार अभ्यासपत्रिका-१ |
| २. | वि-त व्यवस्थापन-अभ्यासपत्रिका-२ |
| ३. | विपणन व्यवस्थापन-अभ्यासपत्रिका-३ (अभ्यास साहित्य इंग्रजी/मराठी उपलब्ध आहे.) |

| | |
|---|---|
| ४. | **उपयोजित घटक गट (खालील पैकी कोणतेही दोन)** |
| १. | निर्यात विपणन (अभ्यास साहित्य इंग्रजी/मराठी उपलब्ध आहे.) |
| २. | विपणन संशोधन (अभ्यास साहित्य इंग्रजी/मराठी उपलब्ध आहे.) |
| ३. | कामगार संघटना तत्वे आणि औद्योगित संबंध |
| ४. | प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष कर पध्दती |
| ५ | कामाच्या ढिकाणी मानवी वागणुकीचे मानसशास्त्र |

**सूचना:** जे विद्यार्थी तृतीय वर्ष वाणिज्य शाखेच्या परिक्षेला बसलेले असतील आणि संबंधित विषयाच्या गटात नापास झालेले असतील त्या विद्यार्थ्यांना केवळ नापास झालेल्या विषयाचीच पुन: परिक्षा देता येईल.

## ४.२ वाणिज्य शाखेतील पदव्युत्तर अभ्यासक्रम

## स्नातकोत्तर वाणिज्य अभ्यासक्रम

०.२३११: स्नातकोत्तर वाणिज्य अभ्यासक्रमाचा कालावधी २ वर्षाचा असेल आणि त्याची परीक्षा २ भागात जसे स्नातकोत्तर भाग १ व स्नाताकोत्तर वाणिज्य भाग २ अशी अनुक्रमे पहिल्या वर्षाच्या शेवटी व दुस-या वर्षाच्या शेवटी होईल.
०.२३१३: कुणाही विद्यार्थ्याला स्नातकोत्तर वाणिज्य अभ्यास क्रमाच्या भाग २ च्या परीक्षेला त्याने वाणिज्य अभ्यासक्रमाचे पदवी प्रमाणपत्र घेतल्याशिवाय बसण्याची परवानगी दिली जाणार नाही.
०.२३१४: एखादा परीक्षार्थी स्नातकोत्तर वाणिज्य भाग १ परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर त्याला पुन: त्याच परीक्षेला निकाल सुधारण्याच्या उदद्‌ेशान बसू दिले जाणार नाही.

## ४.२.१ एम.कॉम. भाग-१

**क) स्नातकोत्तर वाणिज्य भाग १ व २ साठी विषयांची यादी:**

विषयांची रचना: एकूण ८०० गुणांचे ८ विषय आहेत. प्रत्येकी १०० गुणांचे, ३ तास कालावधीचे प्रश्नपत्रिका असेल.

| **स्नातकोत्तर वाणिज्य भाग १ ला** | **स्नातकोत्तर वाणिज्य भाग २ रा** |
|---|---|
| **विषयाचे नाव** | **विषयाचे नाव** |
| अनिवार्य विषय<br>डावपेचाचे व्यवस्थापन | अनिवार्य विषय |
| अर्थविषयक जागतिक व्यापार आणि अर्थव्यवस्था (सुधारीत) | संशोधन शास्त्र |
| वैकल्पीक विषय<br>गट अ - लेखाशास्त्र विभाग<br>अभ्यासपत्रिका १ प्रगतीशील आर्थिक लेखाशास्त्र<br>(अभ्यास साहित्य फक्त इंग्रजीत उपलब्ध आहे.) | वैकल्पीक विषय<br>गट अ - लेखाशास्त्र विभाग<br>अभ्यासपत्रिका ३ प्रगतीशील आर्थिक व्यवस्थापन |
| अभ्यासपत्रिका २ प्रगतीशील मूल्यमापन | अभ्यासपत्रिका ४ प्रगतीशील हिशोब तपासणी<br>अभ्यासपत्रिका ५ प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष कर आकारणं |
| **किंवा** | **किंवा** |
| **गट ब - व्यावसायिक व्यवस्थापन** | **गट ब - व्यावसायिक व्यवस्थापन (सुधारीत)** |
